नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काजळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६५। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) | शनिवार ३१/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

२५ गोवंशीय जनावरांची कत्तलीपासून सुटका- दोघे ताब्यात

एलसीबीची संगमनेरात कारवाई; मात्र सराईत कत्तलखान्यांना अभय मिळत असल्याच्या आरोपांची चर्चा

युवावार्ता (प्रतिनिधी) :

संगमनेर - कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवलेल्या २५ गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने छापा टाकून सुटका केली. संगमनेर शहरातील जमजम कॉलनी परिसरातील मोना प्लॉट येथे बुधवारी (दि. २८) ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ५ लाख ३० हजार रुपये किमतीच्या गाय, गोऱ्हे व कालवडी अशा २५ जनावरांना ताब्यात घेण्यात आले असून, दोघांना पोलिसांनी पकडले आहे. तर अन्य तीन संशयित फरार आहेत. दरम्यान, एलसीबीच्या या कारवाईचे स्वागत होत असतानाच, शहरातील काही ठराविक ठिकाणीच कारवाई केली जाते, तर अनेक सराईत कत्तलखान्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांना अभय दिले जात असल्याचा आरोपही नागरिकांमधून होत आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईतील निवडकपणाबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला देण्यात आले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. जमजम कॉलनीतील पाण्याच्या टाकीजवळील मोकळ्या प्लॉटवर गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याची माहिती मिळताच पथकाने तातडीने छापा टाकला. यावेळी २५ जनावरे बांधून ठेवल्याचे आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून नदीम रेहमान कुरेशी (वय ३९, रा. मदिनानगर, गल्ली क्रमांक ५, संगमनेर) आणि राजमोहम्मद आरिफ सय्यद (वय ४०, रा. मदिनानगर, गल्ली क्रमांक १, संगमनेर) यांना ताब्यात घेतले. जनावरांच्या मालकीबाबत चौकशी केली असता, ही जनावरे लाला रफीक कुरेशी, जहीर अन्वर कुरेशी आणि शमसू कुरेशी (पूर्ण नाव माहीत नाही) यांची असल्याचे त्यांनी सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे तिघे संशयित सध्या फरार आहेत. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत. एलसीबीच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे अवैध गोवंश वाहतूक व कत्तलीच्या प्रकारांवर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे. मात्र, संगमनेर शहर व परिसरात गोवंश कत्तलीसंदर्भातील अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी यापूर्वीही पुढे आल्या आहेत. अशा परिस्थितीत एखाद्या ठिकाणी छापा टाकून काही जनावरे ताब्यात घेण्यापलीकडे या अवैध व्यवसायाच्या संपूर्ण साखळीवर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, काही ठराविक ठिकाणीच एलसीबीकडून कारवाई केली जाते, तर अनेक सराईत कत्तलखाने आणि त्यांच्या मागील सूत्रधारांना अभय दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, याची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करणे गरजेचे आहे. केवळ गोपनीय माहिती मिळाल्यानंतर छापे टाकण्याऐवजी अवैध व्यवसायाची मुळे शोधून त्यामागील आर्थिक व्यवहार, पुरवठादार आणि मुख्य सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचणे आवश्यक आहे. एका ठिकाणी कारवाई आणि दुसऱ्या ठिकाणी दुर्लक्ष, अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे या कारवाईचे कौतुक करतानाच, संगमनेरातील सर्व संशयित ठिकाणांची समान निकषांवर तपासणी करून अवैध कत्तलीच्या व्यवसायाविरोधात व्यापक आणि भेदभावरहित मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, गणेश धोत्रे, अभिजीत अरकल, रणजीत जाधव, अमृत आढाव, सतीश भवर, विशाल तनपुरे व योगेश कर्डिले यांच्या पथकाने सहभाग घेतला.

जिल्हा बँकेसाठी २ नोव्हेंबरला मतदान!

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापवले आहे. बँकेच्या २१ संचालकपदांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्यानंतर उर्वरित १० जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, ३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय वर्चस्वाची लढाई निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्याच्या राजकारणात पारंपरिक विरोधक मानले जाणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे गट या निवडणुकीत एकत्र आले आहेत. त्यांच्या सहकार पॅनलसमोर खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन गट आणि सभापती राम शिंदे यांच्याशी संबंधित उमेदवारांचे आव्हान आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ बँकेच्या संचालक मंडळापुरती मर्यादित न राहता जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय समीकरणांची कसोटी ठरणार आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील पाच जागांसाठी जिल्ह्यातील ३ हजार ८३७ मतदार मतदान करणार आहेत. तर सोसायटी आणि शेतीपूरक मतदारसंघांमध्ये संबंधित मतदारसंघातील पात्र मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली असून तालुकानिहाय मतांची जुळवाजुळव सुरू आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी, विकास सोसायट्या आणि सहकार क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाची आर्थिक संस्था आहे. त्यामुळे या निवडणुकीत कोणत्या गटाला किती प्रतिनिधित्व मिळते, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

केवायसी रखडलेल्या ८१ लाख लाडक्या बहिणींना दिलासा!

पात्र महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेल्या राज्यातील लाखो महिलांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे किंवा तांत्रिक अडचणींमुळे योजनेचा सन्माननिधी न मिळालेल्या सुमारे ८१ लाख महिलांना पुन्हा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. या पात्र महिलांच्या बँक खात्यात १ हजार ५०० रुपयांचा हप्ता जमा करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती समोर आली आहे.

अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मुंबईच्या दिशेने मोर्चा काढण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोर्चातील शिष्टमंडळाला चर्चेसाठी सह्याद्री अतिथीगृह येथे आमंत्रित केले होते. या बैठकीत शेतकरी, कष्टकरी यांच्या प्रश्नांसह लाडकी बहीण योजनेतून महिलांना वगळले जात असल्याचा मुद्दाही किसान सभेच्या प्रतिनिधींनी ठामपणे मांडला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, संबंधित विभागांचे मंत्री तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील विशेषतः आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील अनेक महिलांना तांत्रिक अडचणी, कागदपत्रांची अपूर्णता आणि ई-केवायसी प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे योजनेचा लाभ मिळत नसल्याचे शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

ई-केवायसी रखडलेल्या आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे सन्माननिधीपासून वंचित राहिलेल्या पात्र महिलांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याचे सांगण्यात येत आहे. जवळपास ८१ लाख महिलांच्या अडचणी दूर करून त्यांना योजनेच्या लाभाच्या प्रवाहात पुन्हा आणण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून हप्त्याच्या प्रतीक्षेत असलेल्या महिलांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. विशेषतः ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागांतील महिलांना या निर्णयाचा मोठा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झालेल्या महिलांना पुन्हा संधी देण्यासाठी सध्या बंद असलेले पोर्टल सुरू करण्याबाबतही हालचाली होण्याची शक्यता आहे. ज्या महिलांची केवायसी प्रक्रिया अपूर्ण आहे, तसेच प्रक्रिया पूर्ण करूनही तांत्रिक कारणांमुळे ज्यांना लाभ मिळालेला नाही, अशा महिलांच्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे ८१ लाख महिलांना १ हजार ५०० रुपयांचा सन्माननिधी मिळण्याची आशा निर्माण झाली असली, तरी प्रत्यक्ष लाभासाठी शासनाचा अधिकृत निर्णय, पोर्टल सुरू होण्याची तारीख आणि पात्रता पडताळणीबाबतचे स्पष्ट निर्देश येणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे आता शासनाच्या अधिकृत घोषणेकडे राज्यातील लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे.

हॉलमार्क प्रमाणित
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
*नियम व अटी लागू.
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

राजपाल खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...
राजपाल

सणासुदीत सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर 50% पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
अॅडव्हान्स बुकिंगनंतर सोन्याचा दर कमी झाल्यास, खरेदीच्या वेळी असलेल्या कमी दरानेच सोने खरेदी करता येईल.
सर्वात कमी भाव
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 937201 2044

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

संगमनेरमध्ये प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त

१८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

संगमनेर (प्रतिनिधी) :

शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित तंबाखू आणि पानमसाल्याची सर्रास विक्री सुरू असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संगमनेर शहरातील विजयनगर-कुरण रोड परिसरात छापा टाकून प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला. या कारवाईत विविध कंपन्यांचे पानमसाला, सुगंधित तंबाखू आणि एक मोबाईल असा एकूण १८ हजार ६३५ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी (दि. २८) रात्री ही कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक संगमनेर शहरातील अवैध धंद्यांची माहिती घेत असताना विजयनगर, कुरण रोड परिसरात राहणारा राजू बाबू शेख (वय ४९) हा प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व पानमसाल्याची विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून विविध कंपन्यांचे प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थ तसेच एक मोबाईल जप्त करण्यात आला. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, हा माल वसीम (पूर्ण नाव माहिती नाही) आणि युसूफ चौगुले (रा. घारगाव, ता. संगमनेर) यांच्याकडून घेतल्याचे राजू शेख याने सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामुळे प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या पुरवठा साखळीतील अन्य व्यक्तींचाही सहभाग तपासाच्या केंद्रस्थानी आला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दीपक जाधव यांच्या फिर्यादीवरून राजू बाबू शेख, वसीम आणि युसूफ चौगुले या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अन्नसुरक्षा व मानके कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विकास ढोकरे करीत आहेत.

दरम्यान, घारगाव परिसरातील कथित 'लव्ह जिहाद' प्रकरणातील मास्टरमाईंड

फरार युसूफ चौगुलेचे पुन्हा गुटखा तस्करीत नाव

असल्याचा आरोप असलेला तसेच कऱ्हे घाटातील लाखो रुपयांच्या गुटखा प्रकरणात फरार असल्याचे सांगितले जाणारे युसूफ चौगुले याचे पुन्हा एकदा प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांच्या पुरवठ्याच्या प्रकरणात नाव समोर आले आहे. यामुळे संगमनेर तालुक्यातील गुटखा तस्करीचे जाळे आणि त्यामागील पुरवठादारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

यापूर्वीच्या प्रकरणातही त्याचा शोध सुरू असल्याचे सांगितले जात असताना आता नव्या गुन्ह्यात त्याचे नाव समोर आल्याने पोलिसांसमोर त्याला शोधून अटक करण्याचे आव्हान उभे राहिले आहे. प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई होत असली, तरी या व्यवसायाला माल पुरवणाऱ्या मुख्य सूत्रधारांपर्यंत पोलीस कधी पोहोचणार आणि फरार युसूफ चौगुलेला कधी अटक होणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

ISRO शैक्षणिक सहलीसाठी वडगाव लांडगा शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर: जि. प. प्राथमिक शाळा वडगाव लांडगा येथील अमेय आदिनाथ गडगे (इयत्ता ५ वी) व कु. प्राप्ती अरुण तोरकडी (इयत्ता ६ वी) यांची ISRO शैक्षणिक सहल २०२६ साठी निवड झाली. संगमनेर तालुक्यातून निवडलेल्या तीन विद्यार्थ्यांपैकी दोघे याच शाळेतील आहेत.

यावर्षी शाळेतील सात विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय चाचणी गाठली; त्यापैकी दोघांनी अंतिम निवडीत यश मिळविले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी ISRO सहलीसाठी सलग तीन वर्षे गुणवत्ता सिद्ध केली आहे. २०२४ मध्ये सत्यजित देशमुख, २०२५ मध्ये प्रसाद तोरकडी आणि २०२६ मध्ये अमेय गडगे व प्राप्ती तोरकडी यांची निवड झाली. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे हे सातत्यपूर्ण यश अभिमानास्पद मानले जात आहे.

शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन, नियमित सराव, सामान्य ज्ञानाची तयारी आणि स्पर्धा परीक्षांसाठीचे मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाले. शाळेने क्रीडा, सांस्कृतिक व विविध वैयक्तिक स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'मिशन आपुलकी'तून लोकसहभागाने भौतिक सुविधा उभारण्यात आल्या असून शाळेची पटसंख्याही वाढत आहे.

मागील वर्षी प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अमेय गडगे व शौर्य गावडे या विद्यार्थ्यांनी व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्राप्ती तोरकडी या विद्यार्थिनीने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते; २०२७ परीक्षेसाठी इयत्ता ५ वीच्या विद्यार्थ्यांची तयारी सुरू आहे.

या यशाबद्दल तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी गुंड साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी वलवे मॅडम, केंद्र समन्वयक जाधव साहेब, शाळा व्यवस्थापन समिती व समस्त ग्रामस्थ वडगाव लांडगा यांनी विद्यार्थी व शिक्षक वृंद यांचे अभिनंदन केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर
(उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.३)

भूमि संपादन, पुनर्वसन व पुरर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनयम, २०१३ चे कलम १९ खालील प्राथमिक अधिसूचना

अधिसुचना

क्र. भूसं/मौजे चापडगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर /एलएक्यू/एसआर/०५/२०२५

ज्या अर्थी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ड) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण–२०२०–प्र.क्र.५/अ–३ दिनांक ०३ ऑगस्ट २०१५ (यात यापूढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

निर्देश आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी अहमदनगर जिल्हयाच्या जिल्हाधिका–यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमिनी असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुर्नवसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ५ अनुसार कोणतीही व्यक्ती, हि अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, काही जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका–यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका–यांकडून भरपाई दिली जाणार नाही;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अ नुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापूढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका–यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), अहिल्यानगर यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसुची – एक
जमिनीचे वर्णन

गावाचे नाव – चापडगाव **तालुका – कर्जत** **जिल्हा – अहिल्यानगर**

अ.क्रं.	भूमापन किंवा गट नंबर	आवश्यक जमीनीचे अंदाजित क्षेत्र हेआर	अ.क्रं.	भूमापन किंवा गट नंबर	आवश्यक जमीनीचे अंदाजित क्षेत्र हेआर
१	१४६/१क	०.०७	१८	१२६/१	०.०८
२	१४६/२ब	०.१३	१९	१२६/२	०.३२
३	१४६/२अ	०.१२	२०	१२६/३	०.०७
४	१४६/३/१	०,२०	२१	१२५/१	०.१५
५	१४७/३अ/१	०.२५	२२	१२५/२	०.१४
६	१४७/३अ/३	०.०८	२३	१२५/३	०.१६
७	१४७/३ब	०,२०	२४	१२४/३	०.४७
८	१४७/३/क	०.१०	२५	१२३/१	०.५५
९	१४७/१	०.१३	२६	८०/१	०.१८
१०	१५५/१अ	०.०३	२७	८०/२ब	०.२४
११	१५४	०.६३	२८	८१/१	०.२५
१२	१५७	०.५४	२९	८१/२	०.२६
१३	१५८/४	०.०८	३०	८२/१	०.२६
१४	१५८/५	०.५०	३१	८२/२	०.२२
१५	१२७/१	०.४७	३२	१९४/१	०.४४
१६	१२७/२	०.०९	३३	११४/२	०.१२
१७	१२७/४	०.०९	३४	९०/१	०.७१
				एकूण	८.३३

अनुसूची – दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव : कुकडी डावा कालव्यावरील कर्जत शाखा कालव्याची चापडगाव चारी सा.क्र. १/५६० ते ३/३३० व डावी उपचारी (एस.आर.क्र. १/२००७)

प्रकल्प कामाचे वर्णन – : कुकडी डावा कालव्यावरील कर्जत शाखा कालव्याची चापडगाव चारी सा.क्र. १/५६० ते ३/३३० व डावी उपचारी साठी भूसंपादन या प्रयोजनासाठी (एस.आर.क्र.१/२००७) मौजे चापडगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथील जमीनीचे भूसंपादन क्षेत्र ८ हे ३३ आर जमीन संपादित करणे.

समाजाला होणारे लाभ – : सिंचन सुविधा

अनुसुची – तीन
बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे लागू नाही

जिमाका /नगर/जाहि/१६५/२०२६

कुटे हॉस्पिटलमध्ये शनिवारी भव्य महा आरोग्य शिबिराचे आयोजन

विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन

पात्र रुग्णांना शासकीय योजनांतून मोफत उपचारांची सुविधा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच विविध आजारांचे वेळेत निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या सामाजिक बांधिलकीतून कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर, संगमनेर यांच्या वतीने शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत हे शिबिर पार पडणार असून, विविध वैद्यकीय क्षेत्रांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिरात शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप कुटे, मेंदू व मणक्याच्या विकारांचे तज्ज्ञ डॉ. विनायक महाजन, जनरल मेडिसिन तज्ज्ञ डॉ. फहिमोद्दीन शेख आणि हाडे व सांध्यांच्या विकारांचे तज्ज्ञ डॉ. पृथ्वीराज देशमुख हे रुग्णांची तपासणी करणार आहेत.

थायरॉईड, पोटदुखी, पोटातील गाठ, अपेंडिक्स, मूळव्याध, भगंदर, मुतखडा, मेंदू व मणक्याचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनीचे आजार, सांधेदुखी, गुडघेदुखी यांसह विविध आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना या शिबिरात

डॉ. सोनाली प्र. कुटे डॉ. प्रदिप भा. कुटे

तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व मार्गदर्शन घेता येणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे.

या शिबिराचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय आरोग्य योजनांच्या माध्यमातून मोफत उपचार तसेच आवश्यक शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत यांसह इतर संबंधित शासकीय आरोग्य योजनांचा समावेश आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचार घेण्यास विलंब करणाऱ्या गरजू रुग्णांनाही या सुविधेचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे.

नागरिकांनी आजार अंगावर न काढता वेळेत तपासणी करून घ्यावी आणि या महा आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटरच्या वतीने करण्यात आले आहे.

शिबिराचे ठिकाण : कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर, ४० फूट डी.पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क :
८८८८८८२२२५,
८८८८७३२२२५,
८८८८३७२२२५.

परीक्षा शुल्कावरून रोहित पवार विद्यार्थ्यांसाठी आक्रमक

मुंबई - राज्यभरातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि शैक्षणिक शुल्क माफीच्या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य सरकारने नुकताच परीक्षा शुल्क माफीचा निर्णय जाहीर केला असला, तरी त्यात सवलती कमी आणि जाचक अटीच जास्त असल्याची टीका रोहित पवार यांनी केली आहे. तसेच, येत्या २ तारखेपूर्वी सरकारने औदार्य दाखवून विनाअट सरसकट शुल्क माफीचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली आहे. रोहित पवार यांनी पोस्ट करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले आहे.

विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगत रोहित पवार म्हणाले, राज्यभरातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी आणि शैक्षणिक शुल्क माफी मिळावी, यासाठी आम्ही सातत्याने सरकारकडे पाठपुरावा करत आहोत. मात्र, सरकारकडून केवळ परीक्षा शुल्क माफीचा निर्णय घेण्यात आला; आणि त्यातही सवलती कमी आणि अटी जास्त, असाच प्रकार झाला आहे.विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत रोहित पवार यांनी सरकारसमोर आणि प्रशासनासमोर स्पष्ट मागण्या ठेवल्या आहेत.

'आनंदऋषीजी 'तील गैरव्यवहार

न्यायालयाने पोलिसांना बजावली नोटीस

संगमनेर - येथील राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्थेतील गैरव्यवहाराचे प्रकरण आता न्यायालयात पोहोचले आहे. १४ कर्जदारांच्या तक्रारींमध्ये कर्जमंजुरी, प्रत्यक्ष वितरित रक्कम आणि मालमत्तांच्या मूल्यांकनाबाबत गंभीर अनियमिततेचे आरोप न्यायालयात करण्यात आले आहेत.

या अर्जावर संगमनेरमधील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जी. ए. करजगार यांनी शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना नोटीस बजावली आहे. या नोटिशीमध्ये तक्रारदाराचा जबाब नोंदवण्यात न आल्याबाबत कारणे स्पष्ट करून ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणात एकूण १४ तक्रारदार असून, आणखी काहीजण पुढे येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विद्यानगर परिसरातील आचार्य आनंदऋषीजी महाराज नागरी सहकारी पतसंस्थेतील ११ कोटी सात लाख रुपयांच्या कर्जमंजुरीच्या तुलनेत प्रत्यक्ष दोन कोटी ४६ लाख २६ हजार रुपये मिळाल्याचा दावा असून, तब्बल आठ कोटी ६० लाख ७४ हजार रुपयांची तफावत असल्याचा आरोप आहे. या व्यवहाराची सखोल चौकशी करून आर्थिक नोंदींचे स्वतंत्र लेखापरीक्षण करण्याची मागणी तक्रारदार कल्पेश फुलचंद गांधी यांनी न्यायालयात केली आहे. आचार्य आनंदऋषी पतसंस्थेतील कथित घोटाळा प्रकरणाचे कामकाज वरिष्ठ अधिष्ठाता प्रसन्नकुमार जोशी आणि प्रथमेश गांधी हे पाहत आहेत.

समाजसेवक बाबुराव बाळाजी देशमुख भावपूर्ण श्रद्धांजली !

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अगस्ती महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी समारंभाचे निमंत्रण देण्यासाठी जलनायक, माजी मंत्री आदरणीय मधुकरराव पिचड साहेबांच्या समवेत धामणगाव आवारी येथे (अताएसो चे माजी कार्यकारिणी सदस्य) आदरणीय बाबुराव देशमुख यांना भेटून त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यासाठी जाण्याचा योग एकदीड वर्षांपूर्वी आला.

आदरणीय बाबुराव देशमुखांच्या धामणगाव आवारी निवासस्थानी आदरणीय पिचड साहेब, मा. वैभवभाऊ यांच्यासह सन्माननीय कार्यकारिणी सदस्य आणि प्राचार्य डॉ. भास्कर शेळके सर्वांचे झालेले आतिथ्य तसेच बाबुराव देशमुख यांचा सत्कार संस्मरणीय ठरला. आदरणीय बाबुराव बाबांचे वय आणि त्यांचा दिनक्रम या बाबी थक्क करणाऱ्या. बाबुराव देशमुख यांनी तत्कालीन अकोले संगमनेर स्नेहवर्धक संघटना - मुंबई च्या माध्यमातून आर्थिक सहकार्य अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीस केल्याची आठवण याप्रसंगीच्या चर्चेदरम्यान समजली. वयाचे शतक ओलांडलेल्या बाबांनी कधीही कोणत्याही पदाची आस अपेक्षा न ठेवता आदरणीय पिचड साहेबांना सातत्याने साथ दिल्याचे खुद्द आदरणीय पिचड साहेब यांनी आवर्जून सांगितले होते.

निरलस प्रांजळ भावनेतून आयुष्यात सामाजिक - राजकीय क्षेत्रात असूनही तळमळीने कार्य करणारी बाबुराव बाबांसारखी तोलामोलाची माणसे हेच आदरणीय पिचड साहेबांचे बलस्थान ठरले . अकोले एज्युकेशन संस्थेला कायम बाबुराव देशमुख साहेबांचे अनमोल सक्रीय मार्गदर्शन लाभले होते. संस्थेच्या उभारणीच्या काळात आर्थिक सहकार्य लोकवर्गणीतून उभे करताना तत्कालीन परिस्थितीत बाबुराव देशमुख यांनी टाकलेले पाऊल संस्मरणीय असल्याचा उल्लेख अनेक मान्यवरांनी व्यक्त केला. धामणगाव आवारी येथील संस्थेच्या राजीव गांधी माध्यमिक विद्यालयास हे आर्थिक सहकार्य पुढे लाभले.

मा. बाबुराव देशमुख यांनी गावातील विकास कार्यातही मार्गदर्शकाची संस्मरणीय भूमिका बजावली. वयाची १०४ वर्षे पूर्ण करणाऱ्या बाबुराव देशमुख बाबांचे शेवटपर्यंत वर्तमानपत्राचे वाचन असायचे . धामणगाव आवारी ते अकोले गावापर्यंत अनेक वर्षे ते नियमित पायी यायचे . महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी निमंत्रण भेटीवेळी आदरणीय मधुकरराव पिचड साहेबांनी त्यावेळी बाबुराव देशमुख यांचेशी अगदी मनमोकळेपणाने संवाद साधला होता. संस्थेच्या शैक्षणिक इतिहासातील एक दीर्घायु व्यक्तित्व हरपले आहे..

भावपूर्ण आदरांजली...

प्रा. डॉ. सुनील शिंदे
अगस्त्य फीचर्स, अकोले

भावपूर्ण श्रद्धांजली- संगमनेर, अकोले तालुका स्नेहवर्धक संघटना, मुंबई

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

बाबूजी सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक चळवळींचे प्रेरणास्थान

प्रेमानंद रुपवते यांच्या विचारांची समाजाला खरी गरज - शिक्षणतज्ज्ञ अरविंद वैद्य

मुंबई (वृत्तसंस्था)

प्रेमानंद रुपवते तथा बाबूजी हे महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक चळवळींमध्ये कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान होते. 'प्रवर्तनाय' या साप्ताहिकाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक दूरदृष्टी आणि परिवर्तनवादी विचारांची मांडणी केली. नवीन शैक्षणिक धोरण १९८६ संदर्भात मुंबईतील चेतना महाविद्यालयात शैक्षणिक परिषदेचे आयोजन करून कार्यकर्त्यांना नव्या शैक्षणिक प्रवाहांची जाणीव करून दिली. तसेच तत्कालीन दिग्गज राजकीय नेत्यांचा परिचय करून देत कार्यकर्त्यांची वैचारिक बैठक समृद्ध केली. अशा दूरदृष्टी असलेल्या आणि कार्यकर्त्यांना दिशा देणाऱ्या नेतृत्वाची आज समाजाला खऱ्या अर्थाने गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ अरविंद वैद्य यांनी केले.

बहुजन शिक्षण संघाचे विश्वस्त आणि जनसामान्यांचे नेते बाबूजी उर्फ प्रेमानंद रुपवते यांच्या ८० व्या जयंतीनिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. बहुजन शिक्षण संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत अरविंद वैद्य, नाट्यलेखक व अभिनेते डॉ. सोमनाथ मुटकुळे, सुशीलाबाई दादासाहेब रुपवते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बहुजन आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षा रुपवते यांनी प्रास्ताविकातून बाबूजींच्या आठवणींना उजाळा दिला. एक प्रभावी राजकीय नेता, कुटुंबप्रमुख, साहित्य आणि संगीताचा रसिक अशा विविध भूमिका बाबूजींनी समर्थपणे पार पाडल्या. आजच्या 'जेन झी' पिढीला समजून घेऊन तिला योग्य मार्गदर्शन व पाठबळ देण्याची क्षमता असलेले बाबूजी

हे वेगळे व्यक्तिमत्त्व होते, असे त्यांनी नमूद केले.

बहुजन शिक्षण संघाचे कार्यकारी विश्वस्त ॲड. संघराज रुपवते यांनी बाबूजींच्या राजकीय, सामाजिक आणि व्यक्तिगत मैत्रीतील अनेक आठवणी सांगितल्या. बाबूजींनी अनेक निवडणुका लढवल्या. त्यात अनेकदा अपयशही आले; मात्र निवडणूक प्रचार असो किंवा सामाजिक प्रश्नांसाठीचा संघर्ष, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कधीही मावळले नाही. ते केवळ रसिक, प्रभावी वक्ते आणि सामाजिक प्रश्नांचे जाणकार नव्हते, तर वंचित-उपेक्षितांचे नेतृत्व करणारे उत्तम साहित्यिकही होते. 'प्रवर्तनाय' हे साप्ताहिक सुरू करताना त्यांची साहित्यिक दृष्टी आणि विद्वत्ता प्रकर्षाने जाणवली. अस्खलित मराठीसोबतच हिंदी आणि उर्दू शब्दांचा समर्पक वापर असलेली त्यांची भाषणे काळाशी सुसंगत आणि भविष्याचा वेध घेणारी होती, असे संघराज रुपवते यांनी सांगितले. प्रमुख वक्ते अरविंद वैद्य यांनी बाबूजींसोबतच्या वैयक्तिक मैत्रीचे विविध पैलू उलगडले.

आपण डाव्या चळवळीत कार्यरत असतानाही बाबूजींशी मैत्री झाली आणि त्यानंतर अनेक चळवळींमध्ये खांद्याला खांदा लावून काम करण्याची संधी मिळाली. बाबूजींमुळे काँग्रेस पक्षातील अनेक नेत्यांशी आपली मैत्री झाली आणि ती अखेरपर्यंत टिकून राहिली. विविध आंदोलनांमध्ये एकत्र काम करताना त्यांच्यातील माणुसकी, शैक्षणिक प्रश्न सोडविण्याची तळमळ आणि सामाजिक प्रश्न मार्गी लावण्यासाठीची जिद्द जवळून अनुभवता आली, असे वैद्य यांनी सांगितले.

अभिवादन सभेनंतर संगमनेर येथील डॉ. सोमनाथ मुटकुळे लिखित व दिग्दर्शित 'पुन्हा क्रांतीज्योती' या एकपात्री नाट्यप्रयोगाचे सादरीकरण झाले. या प्रयोगातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा संघर्षमय जीवनपट डॉ. मुटकुळे यांनी अत्यंत प्रभावीपणे रंगमंचावर उभा केला. सावित्रीबाईंचा शैक्षणिक व सामाजिक संघर्ष, महात्मा ज्योतिराव फुले यांची त्यांना मिळालेली भक्कम साथ आणि तत्कालीन सनातनी व्यवस्थेकडून उभयतांना सहन करावा लागलेला त्रास अशा विविध प्रसंगांचे जिवंत चित्रण त्यांनी केले. या नाट्यप्रयोगाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता बाळसराफ यांनी केले, तर प्रकाश पारखे यांनी आभार मानले. यावेळी वसंतराव बैचे, कुसुम बाळसराफ, मिलिंद गायकवाड, डॉ. गोविंद कोळगे, सूर्यकांत शिंदे, वैभव वारे, सुनील जाधव, सुरेश जगधने, सुवर्णा भुजबळ, प्रवीण रुपवते, शाहीर संदेश उमप, सुधीर वाघमारे, रघुनाथ जगताप, विकास जगताप, उल्हास घोडे, विकास वनपत्रे, प्राचार्य सूर्यवंशी यांच्यासह धम्मयात्रा कमिटी मुंबई व ग्रामीणचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

डॉ. राहुल लक्ष्मण वामन यांना पीएच.डी. प्रदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोल्हेवाडी - येथील डॉ. राहुल लक्ष्मण वामन यांना पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे कोल्हेवाडी गावासह वामन परिवाराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. राहुल वामन हे सध्या डॉ. भानुदास डेरे कॉलेज ऑफ फार्मसी येथे प्राचार्य पदावर कार्यरत आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची वाटचाल आणि संशोधनातील योगदानातून त्यांनी हे महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रातूनही त्यांचे कौतुक होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. भानुदास डेरे फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड. श्रीराज डेरे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. तसेच फाउंडेशनमधील सर्व सहकारी, वामन परिवारातील सदस्य, कोल्हेवाडी ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. डॉ. राहुल वामन यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

मेघनंद उद्योग समूहाचे संचालक नंदलाल मणियार यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - येथील मेघनंद उद्योग समूहाचे संचालक तथा ज्येष्ठ उद्योजक नंदलाल मुरलीधर मणियार (वय ७७, रा. दाळमंडई, अहिल्यानगर) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अहिल्यानगरच्या उद्योग, सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

नंदलाल मणियार हे श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्ट, श्रीरामकृष्ण मेडिकल फाउंडेशन

आणि महाराष्ट्र भक्त सेवा ट्रस्ट या तिन्ही संस्थांचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. उद्योग क्षेत्रातील योगदानाबरोबरच सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. आपल्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी शहरातील अनेक सामाजिक संस्था, संघटना तसेच गरजू व्यक्तींना सढळ हाताने मदत केली. कोणत्याही व्यक्तीला अडचणीच्या काळात मदतीचा हात देण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळे समाजातील विविध स्तरांतील लोकांमध्ये त्यांनी आपुलकीचे नाते निर्माण केले होते.

मणियार यांची केवळ उद्योजक म्हणूनच नव्हे, तर मदतीला धावून जाणारे 'भाऊ' म्हणूनही विशेष ओळख होती. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आणि सेवाभावी वृत्तीमुळे ते अनेकांच्या जिव्हाळ्याचे बनले होते. त्यांच्या निधनाने सामाजिक व सेवाभावी क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय आणि चार मुली असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

संगमनेरमध्ये जुनी पेन्शन बंदचा निषेध

शनिवारी काळा दिवस पाळणर, तालुका समन्वय समितीचा निर्धार

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - जुनी पेन्शन योजना बंद करण्याच्या निर्णयाचा निषेध नोंदविण्यासाठी संगमनेर तालुका समन्वय समितीच्यावतीने काळी फीत आंदोलन करण्यात येणार आहे. उद्या (शनिवार दि. ३१) हा 'काळा दिवस' पाळण्याचा निर्धार समितीने केला आहे.

जुनी पेन्शन योजना ही कर्मचाऱ्यांच्य सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेशी निगडित असल्याने, निवृत्तीनंतरच्या आयुष्याची हमी देणारी जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करावी, अशी मागणी कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे. या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी काळी फीत ला-वून कामकाज करण्याच्या माध्यमातून निषेध व्यक्त केला जाणार आहे.

शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचारी संघटना सातत्याने पाठपुरावा करत आहेत. ३१ ऑक्टोबर २००५ पासून सरकारी सेवेत रुजू होणाऱ्यांसाठी हा विना पेन्शनचा कोर कायदा अंमलात आणला आहे. या कायद्याला २१ वर्ष पूर्ण होत आहेत म्हणून शनिवार दि. ३१ ऑक्टोबरला कोळी फीत लावून आंदोलनात सहभागी होत कर्मचाऱ्यांनी

आपला निषेध नोंदवावा, असे आवाहन संगमनेर तालुका समन्वय समितीने केले आहे. यावेळी समितीचे सर्वच पदाधिकारी उपस्थित होते. जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीला व्यापक पाठिंबा मिळावा आणि शासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी, हा या आंदोलनामागील प्रमुख उद्देश असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे.

भीमाशंकर-कर्जत जंगलतोड : विकास हवा, पण पर्यावरणाचा विनाश नको !

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर येथे टोरंट पॉवरच्या प्रस्तावित ३,००० मेगावॅट क्षमतेच्या पंप-स्टोरेज जलविद्युत प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन आणि ३२,४९० वृक्षतोडीचा मुद्दा महाराष्ट्रात गंभीर पर्यावरणीय वादाचा विषय बनला आहे.

महाराष्ट्रात एकूण २३ पम्पड स्टोरेज प्रकल्प येऊ घातले आहेत .राज्यात सुमारे १७३४० चौ. किमी. क्षेत्र परी - संवेदनशील क्षेत्र (Eco Sensitive - Zone) आहे .हे क्षेत्र अहमदनगर , धुळे , नाशिक, नंदुरबार, पुणे, सांगली, सातारा, सांगली, कोल्हापूर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यातील ५६ तालुक्यात २२०० गावात विखुरलेलं आहे .

आता केवळ कर्जत जि रायगड येथील टोरंट कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी वृक्षतोड करण्यात अली आहे, या मुळे संपूर्ण महाराष्ट्रात जनक्षोभ उसळला आहे . या प्रकल्पात ठाणे , रायगड आणि पुणे जिल्ह्यातील ५ तालुके आणि १८८ गावांचा समावेश दिसून येतो . या पूर्वी माळशेजघाट -भोरांडे पॅम्पड स्टोरेज प्रकल्प विरोधात पुणे येथे मोठ्या प्रमाणात जण आंदोलन झाले होते, त्यावेळी हा प्रकल्प तूर्तास लांबणीवर गेला होता. तो उद्रेक कुठे शांत होतो न होतो, तर लगेच साई डोंगर १-कर्जत पॅम्पड स्टोरेज प्रकल्प साठी चे कामकाज सुरु झाले आहे. आता महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ पडला आहे. पाण्याचे साठे कमी पडले आहेत. माणसांसाठी व जनावरांसाठी पिण्याचे पाणी तोकडे पडत आहेत. पर्जन्यवृष्टी तोकडी असून जलसाठे नामशेष होत आहेत. अशा परिस्थितीमधे अशा प्रकारचे प्रकल्प आणून शासन कुणाचा फायदा करू पाहत आहे .

ज्या आदिवासींनी इंग्रज सरकारच्या जुलमी राजवटीपासून आता पर्यंत जंगलांचे संरक्षण केले, जंगली पशु, पक्षी, किटक, यांचा अधिवास राखला आज त्या सर्वांचा बळी घेण्याचं पाप सरकार करत आहेत. केवळ आदिवासी नष्ट होण्याचा नाही तर या

जंगलांसह नैसर्गिक वनसंपदा, पर्यावरण आणि निसर्गाचा समतोल बिघडून या महाराष्ट्राचं वाळवंट होण्यास वेळ लागणार नाही ..

आज पर्यंत धरणे, रस्ते, रेल्वे, महामार्ग , खाणी या प्रामुख्याने आदिवासी पट्ट्यातूनच गेल्या आहेत. अतिशय तुटपुंजी मदत, पुनर्वसन नाही. पिण्यास पाणी नाही, रस्ते, आरोग्य आणि शिक्षणाचा बॅट्या - बोळ झाला तरीही आदिवासी आपलं खडतर जीवन जगत असताना कधी प्रकल्पना विरोध केला नाही , आता मात्र त्याला त्याच्या घरातून बेघर करण्याचा प्रयत्न कधीच सफल होऊ दिला जाणार नाही .

अडाणी, भोळ्या, गरीब आणि या जामिन्याच्या पहिल्या जमीन मालकाला आदिवासीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात अनेक कलमांद्वारे रहिवास, शिक्षण, आरोग्य, नोकरी, राजकीय सत्ता आणि पेसा कायदा, वनहक्क कायदा अशी संरक्षण, सुरक्षितता, आणि विकास यासाठी कायदे केले आहेत. पेसा कायदा - १९९६ व फॉरेस्ट राईट ऍक्ट - २००६ येऊन सुमारे ३० वर्ष आणि २० वर्ष होऊनही तो कागदावरच आहे , त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, ग्रामसभेला कोणताही प्रशासकीय अधिकारी जुमानत नाही ..

वनपट्टे अजूनही लाखो आदिवासी शेतकऱ्यांचे प्रलंबित आहेत . तर लाखो दावे फेटाळले आहेत . त्याची अपिले प्रलंबित आहेत . आदिवासी समाजाची मालकी असताना केवळ २- ३ गुंठ्यांसाठी १०-१२ वर्ष वाट पाहावी लागत आहे. वनक्षेत्रात गवत, वनउपज, अथवा वाळलेलं एक झाडही वनविभाग घेऊन जाऊ देत नाही. स्वतःच्या मालकीच्या बांधावरील सागवान अथवा इतर झाड तोडता येत नाही. अशा परस्थितीत हेच वनविभाग आता अति - संवेदलशील क्षेत्रात लाखो झाडांची कत्तल करण्याची परवानगी कशी देते असा संशय येण्यास जागा आहे .

नुकतीच महसूल मंत्र्यांनी आदिवासींना वनपट्टे देण्याची मोहीम फक्त एक महिना राबविली, या पूर्वी सुद्धा अशे फतवे काढले होते, आदिवासींना वनपट्टे १० वर्ष प्रयत्न करूनही मिळत नाही , पुणे , नगर , ठाणे , रायगड या जिल्ह्यात आदिम अशा कातकरी समाज ब्रिटिश काळापासून राहत आहे . तो वनविभाग , महसूल अथवा गायरान अशा सरकारी जागांवर वास्त्यव करून राहत असून आजही तो कुडाच्या झोपडीत राहत आहे , त्यास या जागा का मिळत नाहीत ..?

मग शासन १ महिना, ३ महिने अथवा ६ महिने या कालावधीत आदिवासींना वनपट्टे देण्याची घोषणा करते , या सर्व कालावधीत किती आदिवासीना वनपट्टे प्राप्त झाले , सरकारने हीही आकडेवारी जनहितार्थ सादर करावी .. याच साठी सरपंच , ग्रामसेवक , तलाठी , महसूल कारकून व वनरक्षक यांची जबाबदारी असते मग तिथे गरीब आदिवासींचा मालकी हक्काचा वनपट्टा देण्यासाठी शिफारस करताना हात का थरथर तात ? असा आमचा प्रश्न आहे .. तांत्रिक व पर्यावरणीय दृष्टिकोनातून, वृक्षतोडीमुळे जैवविविधता, वन्यजीवांचे अधिवास, मृदाधूप, पाण्याचे नैसर्गिक प्रवाह आणि पश्चिम घाटातील पर्यावरणीय समतोल धोक्यात येऊ शकतो. विशेषतः शेकरू व इतर वन्यजीवांच्या भ्रमणमार्गांवर होणारे परिणाम, तसेच आदिवासींच्या वनाधारित उपजीविकेचे नुकसान यांचा स्वतंत्र अभ्यास होणे आवश्यक आहे.

प्रकल्पाला परवानगी मिळाली असली तरी पर्यावरणीय परिणामांचे निष्पक्ष मूल्यमापन आणि अटींचे काटेकोर पालन महत्त्वाचे आहे. त्यामुळे आमच्या समितीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :

१. वृक्षतोडीची सद्यस्थिती व मंजूर वृक्षसंख्येची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करावी.
२. पर्यावरणीय मंजुरी, वनजमीन हस्तांतरण आणि जैवविविधता अहवाल सार्वजनिक करावेत.
३. स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून, लागू असल्यास झएड- कायदा, १९९६ व वनहक्क कायदा, २००६ यांनुसार आवश्यक प्रक्रिया पूर्ण झाल्याची खात्री करावी.
४. पर्यावरणीय परिणामांचा स्वतंत्र पुनर्विचार होईपर्यंत वादग्रस्त क्षेत्रातील पुढील वृक्षतोडीला स्थगिती देण्याचा विचार करावा.
५. केवळ वृक्षारोपणाची संख्या न मोजता, जुन्या जंगलाची जैवविविधता आणि पर्यावरणीय कार्ये जपण्याला प्राधान्य द्यावे.
६. ऱ्या सर्व प्रकल्पांची निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी करून या मध्ये चुकीचा अहवाल देणाऱ्या व ग्रामसभेला प्रकल्पाची संपूर्ण माहिती न देता अपूर्ण अहवाल देणारी , राज्यातील पश्चिम घाट क्षेत्रात परी - संवेदनशील क्षेत्राचा अभ्यास नसणारी संबंधित गावांचे सरपंच , वनरक्षक , तलाठी , कृषी सहाय्यक ,संबंधित गावांचे ग्रामसेवक यांची चौकशी करावी ..

आमची भूमिका स्पष्ट आहे : ऊर्जा विकासाला विरोध नाही; मात्र निसर्ग, जैवविविधता आणि आदिवासींचे हक्क यांची किंमत मोजून होणारा विकास स्वीकारार्ह नाही. पर्यावरणपूरक, पारदर्शक आणि लोकसहभागावर आधारित विकास हाच शाश्वत विकास आहे.

शब्दांकन
इंजि. नामदेव गंभिरे
अध्यक्ष, आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

संकलन - विलास तुपे, राजूर

संपादकीय...

शेतकरी आत्मनिर्भर होणार की कर्जबाजारीच राहणार ?

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. देशातील कोट्यवधी लोकांचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी शेतात घाम गाळतो, अन्नधान्य पिकवतो आणि संपूर्ण देशाची भूक भागवतो. मात्र, देशाचा पोशिंदा असलेला हाच शेतकरी आज आर्थिक संकटाच्या चक्रात अडकला आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, तर कधी बाजारभावातील घसरण अशा अनेक संकटांचा सामना करताना त्याचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडते. त्यामुळे एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे शेतकरी खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होणार की कर्जबाजारीच राहणार? भारताला कृषिप्रधान देश म्हटले जाते. स्वातंत्र्यानंतर देशाने कृषी क्षेत्रात मोठी प्रगती केली. हरितक्रांतीमुळे अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित बियाणे, रासायनिक खते आणि सिंचन सुविधांमुळे शेती उत्पादनक्षम बनली. मात्र, या प्रगतीचा फायदा शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत अपेक्षित प्रमाणात दिसून येत नाही. आजही अनेक शेतकरी पावसावर अवलंबून आहेत. पावसाने दगा दिला तर पीक हातचे जाते आणि अतिवृष्टी झाली तर उभे पीक उद्ध्वस्त होते. अशा परिस्थितीत शेतकऱ्याने पुढील हंगामाची तयारी कशी करायची, हा मोठा प्रश्न असतो. शेतीचा उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी, इंधन, वीज आणि शेतीसाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या किमती वाढत आहेत. मात्र, शेतमालाला मिळणारा बाजारभाव उत्पादन खर्चाच्या तुलनेत अनेकदा कमी असतो. कांदा, टोमॅटो, सोयाबीन, कापूस, मका आणि इतर पिकांच्या बाबतीत ही समस्या वारंवार दिसून येते. एखाद्या वर्षी चांगले उत्पादन झाले तर बाजारात आवक वाढते आणि भाव कोसळतात. उत्पादन कमी झाले तर शेतकऱ्याला विक्रीसाठी मालच उपलब्ध राहत नाही. म्हणजेच उत्पादन असो किंवा नसो, संकट मात्र शेतकऱ्याच्या पाचवीलाच पूजलेले आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींमागील आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे कर्जाचा वाढता बोजा. पीक घेण्यासाठी शेतकऱ्याला सुरुवातीपासूनच मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. अनेक शेतकरी बँकांकडून पीककर्ज घेतात, तर काहींना खासगी सावकारांकडून पैसे घ्यावे लागतात. पीक चांगले आले आणि योग्य भाव मिळाला तर कर्ज फेडणे शक्य होते. मात्र, नैसर्गिक आपत्ती किंवा बाजारभावातील घसरण यामुळे उत्पन्न घटले की कर्जाचा हप्ता थकतो. त्यावर व्याज वाढत जाते आणि पुढील हंगामासाठी पुन्हा कर्ज घ्यावे लागते. अशा प्रकारे शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकत जातो. सरकारकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या जातात. पीकविमा योजना, पीककर्ज, अनुदान, सिंचन योजना, शेतकरी सन्मान निधी आणि कृषी यांत्रिकीकरण यांसारख्या उपक्रमांमधून शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र, या योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत कितपत पोहोचतो, याचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. पीकविम्याचा लाभ मिळवताना येणाऱ्या अडचणी, नुकसानभरपाईसाठी होणारा विलंब, कागदपत्रांची पूर्तता आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे शेतकऱ्यांचा अनेकदा भ्रमनिरास होतो. योजना जाहीर करणे महत्त्वाचे असले तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिक महत्त्वाची आहे. शेतकऱ्याला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर केवळ कर्जमाफी किंवा आर्थिक मदत हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळणे आवश्यक आहे. बाजारपेठेतील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली पाहिजे. शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. दूध, फळे, भाजीपाला, धान्य आणि कडधान्यांच्या प्रक्रिया उद्योगांना ग्रामीण भागात चालना दिल्यास स्थानिक रोजगारनिर्मितीलाही मदत होईल. पाण्याचे योग्य नियोजन हा शेतीच्या शाश्वत विकासाचा पाया आहे. आज अनेक भागांत पावसाचे प्रमाण अनिश्चित झाले आहे. भूजल पातळी घटत आहे. विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत आहेत. त्यामुळे जलसंधारण, शेततळी, बंधारे, ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यांसारख्या उपाययोजनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. प्रत्येक गावाने आपल्या उपलब्ध पाण्याचे नियोजन केले पाहिजे. पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकपद्धतीत बदल करणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आणि शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे. याशिवाय शेतकऱ्यांना केवळ पारंपरिक शेतीपुरते मर्यादित न ठेवता जोडव्यवसायांकडे वळविणे आवश्यक आहे.

पारनेर पोलिसांची मोठी कारवाई

१३.६१ लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन आरोपींना अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

पारनेर : फिर्यादीच्या वाहनाचा पाठलाग करून वाहन अडवून लुटमार करणाऱ्या आरोपींना पारनेर पोलिसांनी अवघ्या १२ तासांत अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेत एकूण १३ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दि. २८ ऑक्टोबर रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पारनेर तालुक्यातील मांडवे परिसरात ही घटना घडली. फिर्यादी हे पिकअप वाहनातून जात असताना तीन अज्ञात इसमांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवून कार आडवी लावली. त्यानंतर फिर्यादीच्या खिशातील ३ लाख ४१ हजार रुपये रोख रक्कम तसेच त्यांच्यासोबत असलेल्या व्यक्तीचा मोबाईल फोन हिसकावून आरोपी पसार झाले होते. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. याप्रकरणी आरिफ जावीर खान (वय ३०, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर), रोशन चंद्र गेडे (रा. फक्राबाद, ता. अहिल्यानगर) आणि शुभम दत्तात्रय शिंगे (वय ३२, रा. मुकुंदनगर, अहिल्यानगर) या तिघांना अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली महिंद्रा मार्शल कार, ३ लाख ४१ हजार रुपये रोख रक्कम आणि एक ओप्पो कंपनीचा मोबाईल हँडसेट असा एकूण १३ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वामने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे व पारनेर पोलीस पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

जोर्वे विद्यालयात ई कचरा व्यवस्थापन मोहीम सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या जोर्वे तालुका संगमनेर येथील समता विद्या मंदिर व शिल्पव्येता मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा २०२६ अंतर्गत शाळेमध्ये ई कचरा जनजागृती आणि संकलन मोहीम राबविण्यात आली.

विद्यालयातील ई कचरा जनजागृती आणि संकल्पना बाबत ज्येष्ठ शिक्षक गिते राजेंद्र यांनी भारतामध्ये दरवर्षी लाखो टन ई कचरा निर्माण होतो. ई-कचऱ्यात इलेक्ट्रॉनिक वस्तू व यंत्रसामग्री यांचा समावेश होतो. या कचऱ्याच्या पुनर्वापरामुळे हवा, पाणी, माती यामध्ये विषारी घटक मिसळले जातात. या विषारी घटकामुळे मानवाला तसेच संपूर्ण विश्वाला धोका आहे. म्हणून इलेक्ट्रॉनिक वस्तू व यंत्रे याचा काटकसरीने व पुनर्वापर करूया, इलेक्ट्रॉनिक वस्तू संदर्भात वापरा आणि फेकून द्या ,हे तत्व अवलंबने चुकीचे आहे,असे त्यांनी सांगितले .विद्यालयात ई कचरा व्यवस्थापन व पुनर्वापर या संदर्भात निबंध ,चित्रकला व शिल्पकला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. निबंध स्पर्धेचे नियोजन मराठी विषयाच्या शिक्षिका भांगरे के.डी. तर चित्रकला विषयाच्या स्पर्धा कानवडे एस.सी. व शिल्पकला स्पर्धा संदर्भात इंग्रजी विषयाचे शिक्षक भांगरे ए.डी,. श्रीमती भरीतकर एस. जे .यांनी इलेक्ट्रॉनिक टाकाऊ वस्तू पासून टिकाऊ वस्तू बनविण्याची कार्यशाळा घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य भारत हासे ,पर्यवेक्षक तांबे विठ्ठल ,सांस्कृतिक विभाग प्रमुख भांगरे बी.आर .व सर्व शिक्षक वृंदांचे मोलाचे योगदान लाभले .

SAHAKARMAHARSHI BHAUSAHEB THORAT SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD..
Po Sangamner S K - 422608 Tal Sangamner, Dist Ahilyanagar,
Ph No PRI Line 02425-229200, 225370 Mob No 9881125399
E-mail amrutsugar@yahoo.co.in, Websute - www.thoratsugar.com

ETHANOL SALE TENDER NOTICE

Our Sugar Factory to sell the Ethanol that will be produced in the crushing season 2026-2027. Therefore, licensed purchasers are requested to send sealed tenders to the factory administration department by 01/11/2026, mentioning the rate per liter exclusive of tax.

J.B. Ghugarkar, Managing Director — P.D. Ghule, Vice Chairman — B.B. Thorat, Chairman

प्रो. रु. — ॲड. बी. आर. राऊत
रजि. नं. — फौजदारी न्यायालय कोर्ट नं.५
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर

क्रि. चौ.अर्ज नं. ५८०/२०२६ — यांचे कोर्टात

इंद्रभान लोभा मोरे ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे कनकापूर ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याचा मुलगा रोहन इंद्रभान मोरे जन्म दि. १९.०७.२०१९ रोजी मौजे कनकापूर ता संगमनेर जि.अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. अर्जदार याचे जन्माची नोंद कनकापूर, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट न. ५ यांचे कोर्टात जि. बी. अ.नं.५८०/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. १९.०७.२०१९ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी टाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याचा मुलगा जन्म दि. १९.०७.२०१९ रोजी मौजे कनकापूर ता. संगमनेर जि. अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २०/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही तयार करणार — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. २ संगमनेर

प्रो. रु. — ॲड. बी. आर. राऊत
रजि. नं. — फौजदारी न्यायालय कोर्ट नं.५
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर

क्रि. चौ.अर्ज नं. ५८५/२०२६ — यांचे कोर्टात

अमोल सुभाष जमधडे, ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे जवळे कडलग ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याचा जन्म दि. २२/११/१९९५ रोजी मौजेने जवळे कडलग, ता संगमनेर जि अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून अर्जदार यांचे जन्माची नोंद जवळे कडलग, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. ५ यांचे कोर्टात क्रि.ची.अ.नं.५८५/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. २२/११/१९९५ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याचा जन्म दि. २२/११/१९९५ रोजी मौजे जवळे कडलग, ता. संगमनेर जि. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २७/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अपवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्याच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही तयार करणार — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. ५ संगमनेर

पाहिजेत

SR THORAT

मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक

आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस- एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७

युवावार्ता
छोट्या जाहिराताठी संपर्क करा
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

पाहिजेत
ऑफिस बॉय – जागा १
ड्रायव्हर – जागा ३
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
8308015324

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
ASMABEGUM ALIMOHMMADI
NEW NAME AS
ASMA NAUSHAD SHAIKH
ADD – 938 ,JAMMANPURA ,SAYYED BABA CHOWK, SANGAMNER , TAL - SANGAMNER DIST - AHMEDNAGAR

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH NAUSHAD SHAIKH AYYUB BEPARI
NEW NAME AS
NAUSHAD AYYUB SHAIKH
ADD – 938 ,JAMMANPURA ,SAYYED BABA CHOWK, SANGAMNER , TAL - SANGAMNER DIST - AHMEDNAGAR

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ. सौरभ प्रभाकर सोनवणे, रा. मधुकुंज कॉम्प्लेक्स, डॉ. निघुते हॉस्पिटल समोर, नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर, म्यु.घ.नं. -- सि. स. नं. -- स.नं. १५०/२४ या ठिकाणी मध्ये डॉ. सोनवणे दातांचा दवाखाना चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २९/१०/२०२६ — मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

प्रो. रु. — ॲड. बी. आर. राऊत
रजि. नं. — फौजदारी न्यायालय कोर्ट नं.१
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस

मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर

चौ.अर्ज नं. ५८६/२०२६ — यांचे कोर्टात

राहुल शिवाजी उघडे ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे कर्जुले पठार ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याचा जन्म दि. ३१/१०/१९९७ रोजी मौजे कर्जुले पठार ता संगमनेर जि अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. अर्जदार याचे जन्माची नोंद कर्जुले पठार, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे, फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. १ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.५८६/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ३१/१०/१९९७ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याचा जन्म दि. ३१/१०/१९९७ रोजी मौजे कर्जुले पठार ता. संगमनेर जि अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही तयार करणार — हुकूमावरून सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी न्यायलय कोर्ट नं. २ संगमनेर

संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. डॉ अभिजित भिकाजी मुळे, रा. नविन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -- सि. स. नं. -- स.नं. १६४८/अ,१ या ठिकाणी मध्ये निरामय नर्सिंग होम चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. २८/१०/२०२६ — मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

रिक्त पदे भरणे आहे
MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
• बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
• कार्यालयीन प्रशासक – १
• आयटी प्रोफेशनल – १
• संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १
पात्रता १२ वी किंवा पदवीधर, संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा २० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह
Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

फ्लॅट विकणे आहे!
फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी
निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये, किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

कामगार भरती
अकाउंटंट - 01 (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- 05 (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- 01
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

राज्याचे नेतृत्व एकनाथ शिंदेकडे द्या - रविंद्र धंगेकर

मुंबई (वृत्तसंस्था)

विधान परिषद निवडणुकीतील महायुतीच्या कामगिरीनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. या निकालाला राज्याच्या नेतृत्वाचा पराभव असल्याचे सांगत, राज्याचे नेतृत्व बदलून ते पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांच्याकडे दिले पाहिजे, या आपल्या मागणीचा शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी पुनरुच्चार केला आहे. यासोबतच, शिवसेनेवर युतीधर्म न पाळल्याचा आरोप करणारे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांच्यावरही त्यांनी 'ते पगारी माणूस आहेत, त्यांचे काय ऐकता?' अशी टीका केली आहे.

या निवडणुकांच्या निकालाचे विश्लेषण करताना धंगेकर यांनी राज्यातील सध्याच्या नेतृत्वावर अप्रत्यक्षरीत्या निशाणा साधला. पदवीधर आणि शिक्षक मतदार हे उच्च पदावर काम करणारे असतात. राज्याचा तोल कुठल्या बाजूला झुकलाय, हे त्यांना जास्त चांगले समजते. या निवडणुकीत राज्याच्या नेतृत्वाचा कस लागलेला असतो, आणि तो लागलेला दिसत नाही. त्यामुळे हा थेट राज्याच्या नेतृत्वाचा पराभव आहे, असे ते म्हणाले. राज्याचे नेतृत्व बदलले पाहिजे. तीन पक्षांच्या महायुतीत एकनाथ शिंदे यांनी ज्या पार्श्वभूमीवर २०० पेक्षा जास्त आमदार निवडून आणलेत, ते पाहता नेतृत्व पुन्हा एकनाथ शिंदे यांच्याकडेच दिले पाहिजे. जनतेची नाळ त्यांच्यासोबत जोडलेली आहे.धंगेकर म्हणाले, नवनाथ बन हा पगारी माणूस आहे राव, त्याचे काय ऐकता तुम्ही? त्याचे ऐकू नका, असा टोला त्यांनी लगावला. आगामी काळातील परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करताना ते पुढे म्हणाले, आज महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत लोटला गेला आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न प्रचंड आहेत, गरिबी वाढली आहे आणि पुणे शहराला पाणी नाही. अशा परिस्थितीत जर एकनाथ शिंदे यांच्याकडे नेतृत्व दिले, तरच महाराष्ट्राची परिस्थिती अत्यंत चांगली होईल.

झारीतले शुक्राचार्य रोखा - भाजपचा शिवसेनेला इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)

महायुतीविरोधात काम करणारे रवींद्र धंगेकर अब्दुल, सत्तार यांच्यावर कारवाई करा, महायुती टिकवायची असेल तर झारीतले शुक्राचार्य रोखा, असा खणखणीत इशारा भाजपने आज शिवसेनेला दिला. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आज पत्रकार परिषद घेत शिवसेनेचे रवींद्र धंगेकर यांचा माकडछाप म्हणून उल्लेख केला. नवनाथ बन यांनी काल भूमिका मांडल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ प्रवीण दरेकरांसह भाजपचे इतर नेते मैदानात उतरले. आज पुन्हा विधान परिषद निवडणूक निकालावरून महायुतीमध्ये जोरदार जुंपली आहे.

ज्यांनी राजकीय कारकिर्दीसाठी १२ पक्ष फिरले, ज्यांच्या घरातील लोकांचे पुणे महापालिकेत डिपॉझिट जप्त झाले आणि ज्यांना पुणेकरांनी लोकसभा व विधानसभेत घरी बसवले, त्या 'माकडछाप' व्यक्तीने देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर बोलण्याची लायकी नाही. महायुतीत राहून पुण्यात भाजप उमेदवार स्मिता जाधव यांच्याविरोधात अधिकृत सोशल मीडिया पेजवरून प्रचार करणाऱ्या रवींद्र धंगेकरांवर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडपणे बंडखोरी करणाऱ्या अब्दुल सत्तारांवर शिवसेना काय कारवाई करणार? अमरावतीत बंडखोरांवर भाजपने ६ वर्षांसाठी निलंबनाची कुऱ्हाड चालवली, मग शिवसेनेनेही धंगेकर आणि सत्तारांवर तशीच कठोर कारवाई करून युतीधर्म पाळावा, असा सणसणीत आणि थेट सवाल भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी उपस्थित केला आहे.

मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत नवनाथ बन यांनी विधानपरिषद निकालांनंतर मित्रपक्षाकडून सुरू असलेली अंतर्गत चिखलफेक, रवींद्र धंगेकर व अब्दुल सत्तार यांची वक्तव्ये, संजय राऊतांचे '१ एप्रिल'चे भाकीत, ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरण आणि शिवसेनेच्या अस्मितेवरून सुरू असलेल्या वादावर आक्रमकपणे पक्षाची भूमिका मांडली. रवींद्र धंगेकर यांच्या विधानांवर घणाघात करताना नवनाथ बन म्हणाले, ज्यांना एका पक्षात आपले राजकीय करिअर घडवता आले नाही, जे मनसे, काँग्रेस, शिवसेना करत १२ घरे फिरून आले.

राज्यातील २० जिल्हा परिषद आणि २११ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होणार

मुंबई (वृत्तसंस्ता)

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर जागांच्या निवडणुका सरताच आता प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून दीर्घकाळ रखडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला आता वेग मिळणार आहे.

राज्यात एकूण ३४ जिल्हा परिषदा आहेत, त्यापैकी १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये पार पडल्या आहेत. उर्वरित २० जिल्ह्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे निवडणुका रखडल्या होत्या. आज २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या प्रलंबित निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा केला आहे. त्यामुळे पुढच्या काही दिवसांत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांची घोषणा होऊ शकते.

महाराष्ट्रात कोणत्या २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार? - पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर (अहमदनगर), बीड, जालना, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंद्रपूर

राज्यात एकूण ३५१ पंचायत समित्यांपैकी १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारी २०२६ मध्ये पार पडल्या आहेत. उर्वरित २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका ५० टक्के आरक्षणाच्या कायदेशीर पेचामुळे प्रलंबित होत्या, आता संबंधित पंचायत समित्यांमध्येही निवडणुका होणार आहेत.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश देताना, बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास परवानगी दिली होती. मात्र, काही ठिकाणी आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त होत असल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने पुन्हा कायदेशीर पेच निर्माण झाला. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या आत ठेवण्याची अट. ओबीसी आरक्षण लागू करताना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसह सर्व आरक्षणांची एकत्रित मर्यादा ओलांडली जाऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी स्पष्ट केले आहे. त्यामुळे निवडणुका घेताना या घटनात्मक मर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी निवडून देण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

पोदार स्कूलमध्ये जागतिक फुटबॉलपटू जेमी नाइट यांची धमाकेदार एन्ट्री! विद्यार्थ्यांना फ्रीस्टाइल फुटबॉलचे खास धडे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पोदार इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांना जगप्रसिद्ध फ्रीस्टाइल फुटबॉलपटू जेमी नाइट यांचे स्वागत करण्याची संधी मिळाली. जगातील आघाडीच्या दहा फ्रीस्टाइल फुटबॉलपटूंमध्ये गणले जाणारे जेमी नाइट हे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अनेक विक्रम आपल्या नावावर असलेले प्रसिद्ध खेळाडू आहेत.

भारताच्या आठव्या दौऱ्यावर असलेले जेमी नाइट यांनी पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उत्कृष्टता उपक्रमांतर्गत पोदार इंटरनॅशनल स्कूल संगमनेर येथे विशेष कार्यशाळा आयोजित केली. विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण करणे, त्यांची एकाग्रता वाढवणे आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.फुटबॉलवरील असाधारण नियंत्रण कौशल्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित ब्रँड्ससोबत केलेल्या सहकार्यांसाठी जेमी नाइट जगभर प्रसिद्ध आहेत. णएक्र- एणठज २०२० स्पर्धेचे अधिकृत जागतिक शुभंकर म्हणून त्यांनी सादरीकरण केले होते. तसेच, २०१७ आणि २०१८ मधील UEFA चॅम्पियन्स लीगच्या अंतिम सामन्यांमध्येही त्यांनी आपले कौशल्य सादर केले. त्यांच्या अप्रतिम कौशल्याला जगभरातील दिग्गज फुटबॉलपटूंकडून गौरविण्यात आले आहे. या कार्यशाळेत त्यांनी सादर केलेल्या गुरुत्वाकर्षणालाही आव्हान देणाऱ्या चित्तथरारक कसरती आणि अचूक कौशल्याने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले. आपला अनुभव व्यक्त करताना जेमी नाइट म्हणाले, भारतात पुन्हा येणे आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास, कौशल्य व सर्जनशीलतेत झालेली प्रगती अनुभवणे, हा नेहमीच आनंदाचा क्षण असतो. पोदार इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थ्यांचा उत्साह अतुलनीय आहे. त्यांची ऊर्जा आणि गुणवत्ता मला नेहमीच प्रेरणा देते.

पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक श्री. हर्ष पोदार यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले,जेमी नाइट यांचे स्वागत करण्याची संधी आम्हाला अनेक वेळा मिळाली आहे. त्यांच्या प्रत्येक भेटीचा विद्यार्थ्यांवर कायमस्वरूपी सकारात्मक प्रभाव पडतो. त्यांच्या कार्यशाळा केवळ फुटबॉलचे कौशल्य शिकवण्यापुरत्या मर्यादित नसून, त्या विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता आणि चिकाटी यांसारखे महत्वाचे गुण विकसित करतात. विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन शिकण्याची प्रेरणा अशा अनुभवांतून मिळते, असा आमचा ठाम विश्वास आहे.जेमी नाइट यांच्या मते, फ्रीस्टाइल फुटबॉलमुळे शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य विकसित होते तसेच सतत शिकण्याची, स्वत:मध्ये सुधारणा करण्याची आणि आव्हानांवर मात करण्याची सकारात्मक वृत्ती निर्माण होते. ही मूल्ये पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या सर्वांगीण शिक्षणाच्या संकल्पनेशी सुसंगत आहेत. ९९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेले पोदार एज्युकेशन नेटवर्क विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. शिक्षण, क्रीडा आणि कला या क्षेत्रांतील उत्कृष्टतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे आणि त्यांना आत्मविश्वासपूर्ण, सक्षम व जागतिक दृष्टिकोन असलेले नागरिक बनवणे हे संस्थेचे ध्येय आहे.

दिनविशेष

१९८४: — पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून हत्या.

१९८४: — पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून हत्या.

१९६६: — दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना झाली.

१९४१: — माऊंट रशमोअर या स्मारकाचे बांधकाम पूर्ण झाले.

१९२०: — नारायण मल्हार जोशी, लाला लजपतराय व इतर काही जणांनी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (AITUC) स्थापना केली. लाला लजपतराय पहिले अध्यक्ष बनले.

१८७६: — भारतात आलेल्या महाभयानक चक्रीवादळात २,००,००० पेक्षा अधिक व्यक्ती ठार.

१८६४: — नेवाडा हे अमेरिकेचे ३६वे राज्य बनले.

जन्म

१९८०: बंबा बक्या — भारतीय पार्श्वगायक (निधन: २ सप्टेंबर २०२२)

१९४६: रामनाथ पारकर — क्रिकेटपटू (निधन: ११ ऑगस्ट १९९९)

१९२२: नॉरदॉम सिहानोक — कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान (निधन: १५ ऑक्टोबर २०१२)

१८९७: चियांग काई-शेक — चीन गणराज्य (तैवान)चे पहिले पंतप्रधान (निधन: ५ एप्रिल १९७५)

१८९५: सी. के. नायडू — क्रिकेटपटू (निधन: १४ नोव्हेंबर १९६७)

१८७५: सरदार वल्लभभाई पटेल — भारताचे पहिले उपपंतप्रधान — भारतरत्न (मरणोत्तर) (निधन: १५ डिसेंबर १९५०)

१८६०: ज्युलिएट गॉर्डन लो — गर्ल स्काउट्स ऑफ यूएसएचे संस्थापक (निधन: १७ जानेवारी १९२७)

१८३५: अ‍ॅडॉल्फ फॉन बायर — जर्मन रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार

मृत्यू

२०२५: राजेश बॅनिक — भारतीय क्रिकेटपटू

२०२५: रामदर्श मिश्रा — हिंदी साहित्यातील प्रख्यात कवी व लेखक (जन्म: १५ ऑगस्ट १९२४)

२०२२: राज कंवर — भारतीय पत्रकार

२०२२: जमशेद जीजी इराणी — टाटा स्टीलचे प्रसिद्ध उद्योगपती आणि स्टील मॅन ऑफ इंडिया. — पद्मभूषण (जन्म: २ जून १९३६)

२०२२: टी. जे. चंद्रचूडन — भारतीय राजकारणी (जन्म: २० एप्रिल १९४०)

२०२२: सोनाली चक्रवर्ती — भारतीय अभिनेत्री (जन्म: १९६३)

२००९: सुमती गुप्ते — मराठी ज्येष्ठ अभिनेत्री

२००५: अमृता प्रीतम — पंजाबी लेखिका व कवयित्री — ज्ञानपीठ पुरस्कार (जन्म: ३१ ऑगस्ट १९१९)

१९८६: आनंदीबाई शिर्के — लेखिका, बालसाहित्यिका (जन्म: ३ जून १८९२)

१९८४: इंदिरा गांधी — भारताच्या ३ऱ्या आणि पहिल्या महिला पंतप्रधान — भारतरत्न (जन्म: १९ नोव्हेंबर १९१७)

१९७५: सचिन देव बर्मन — भारतीय संगीतकार व पार्श्वगायक, हिंदी चित्रपटसंगीतातील प्रभावी संगीतदिग्दर्शक आणि बर्मन कुटुंबातील ज्येष्ठ कलाकार — पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार,

दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

३१ ऑक्टोबर

१९६६ : दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना

भारताच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात १९६६ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या वर्षी दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. राजधानी दिल्लीतील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच न्यायव्यवस्थेवरील वाढता ताण कमी करण्याच्या उद्देशाने या उच्च न्यायालयाची निर्मिती करण्यात आली. दिल्ली उच्च न्यायालय हे देशातील महत्त्वाच्या उच्च न्यायालयांपैकी एक असून, आजही ते न्यायदानाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडत आहे.दिल्लीला भारताची राजधानी म्हणून विशेष महत्त्व आहे. स्वातंत्र्यानंतर दिल्लीचा विस्तार झपाट्याने होऊ लागला. लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, व्यापारी व्यवहार आणि प्रशासकीय कामकाज यामुळे शहरातील न्यायालयीन प्रकरणांची संख्याही वाढत होती. त्यावेळी दिल्लीतील न्यायिक कामकाजासाठी पंजाब उच्च न्यायालयावर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे दिल्लीसाठी स्वतंत्र उच्च न्यायालय असावे, अशी गरज निर्माण झाली होती.याच पार्श्वभूमीवर भारतीय संसदेने 'दिल्ली उच्च न्यायालय अधिनियम, १९६६' (Delhi High Court Act, 1966) मंजूर केला. या कायद्याच्या आधारे ३१ ऑक्टोबर १९६६ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाची अधिकृत स्थापना करण्यात आली. सुरुवातीला या न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आणि इतर न्यायमूर्तींची नियुक्ती करण्यात आली. न्यायमूर्ती के. एस. हेगडे हे दिल्ली उच्च न्यायालयाचे पहिले मुख्य न्यायमूर्ती होते.दिल्ली उच्च न्यायालयाच्या स्थापनेमुळे राजधानीतील नागरिकांना स्वतंत्र उच्च न्यायालयीन व्यवस्था उपलब्ध झाली. दिवाणी, फौजदारी, घटनात्मक आणि प्रशासकीय स्वरूपाच्या विविध प्रकरणांवर सुनावणी घेण्याची जबाबदारी या न्यायालयाकडे सोपविण्यात आली. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करणे, सरकारी निर्णयांची कायदेशीर वैधता तपासणे आणि न्याय मिळवून देणे ही या न्यायालयाची महत्त्वाची कार्ये आहेत.दिल्ली उच्च न्यायालयाची सुरुवात चार न्यायमूर्तींसह झाली. न्यायमूर्ती के. एस. हेगडे हे पहिले मुख्य न्यायमूर्ती होते. त्यांच्यासोबत न्यायमूर्ती आय. डी. दुआ, न्यायमूर्ती एच. आर. खन्ना आणि न्यायमूर्ती एस. के. कपूर यांनी न्यायदानाची जबाबदारी सांभाळली. सुरुवातीच्या काळात न्यायालयाचे कामकाज ४, मौलाना आझाद रोड येथील एका निवासी इमारतीतून सुरू झाले. त्यानंतर १९६७ मध्ये न्यायालय ट्रॅव्हनकोर हाऊस येथे स्थलांतरित झाले. पुढे पटियाला हाऊस येथेही कामकाज झाले. High Court of Delhi+1दिल्ली उच्च न्यायालयाच्या स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात हिमाचल प्रदेशचाही न्यायालयीन अधिकारक्षेत्रात समावेश करण्यात आला. १ मे १९६७ पासून हिमाचल प्रदेशातील प्रकरणेही दिल्ली उच्च न्यायालयाच्या अखत्यारीत आली.

इंदिरा गांधी : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान

पुण्यतिथी विशेष

इंदिरा प्रियदर्शिनी गांधी या भारताच्या राजकीय इतिहासातील अत्यंत प्रभावशाली आणि महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होत्या. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाच्या राजकारणात वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद (आताचे प्रयागराज) येथे झाला. त्या भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या होत्या. त्यांच्या आईचे नाव कमला नेहरू होते. लहानपणापासूनच त्यांना स्वातंत्र्यलढ्याचे वातावरण अनुभवायला मिळाले. त्यामुळे देशसेवा, राजकारण आणि सामाजिक प्रश्नांविषयी त्यांच्यामध्ये लहान वयातच जाणीव निर्माण झाली.इंदिरा गांधी यांचे शिक्षण भारतासह परदेशातही झाले. त्यांनी पुण्यातील शाळेत तसेच शांतिनिकेतनमधील विश्वभारती विद्यापीठात शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी त्या इंग्लंडला गेल्या. ऑक्सफर्ड विद्यापीठाशी संबंधित शिक्षण

घेत असताना त्यांचा राजकीय विचारांशी अधिक जवळून परिचय झाला. महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि स्वातंत्र्य चळवळीचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. १९४२ मध्ये त्यांनी फिरोज गांधी यांच्याशी विवाह केला. त्यांना राजीव गांधी आणि संजय गांधी अशी दोन मुले होती.भारत स्वतंत्र झाल्यानंतर इंदिरा गांधी यांनी राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्यांचे वडील पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असताना त्या त्यांच्या कामकाजात मदत करत असत. १९५९ मध्ये त्यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. १९६४ मध्ये नेहरूंच्या निधनानंतर लालबहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळात त्यांना माहिती आणि प्रसारण मंत्रीपद देण्यात आले.११ जानेवारी १९६६ रोजी लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर इंदिरा गांधी यांची भारताच्या पंतप्रधानपदी निवड झाली. अशा प्रकारे त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान ठरल्या. त्यांनी १९६६ ते १९७७ आणि त्यानंतर १९८० ते १९८४ या काळात पंतप्रधान म्हणून देशाचे नेतृत्व केले.त्यांच्या कार्यकाळात भारताने अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी अनुभवल्या. १९६९ मध्ये त्यांनी १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. यामुळे बँकिंग क्षेत्राचा विस्तार आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना चालना मिळाली. गरिबी कमी करण्यासाठी त्यांनी 'गरिबी हटाओ' ही घोषणा दिली. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात भारताने निर्णायक विजय मिळवला. या युद्धानंतर बांगलादेश या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती झाली. या विजयामुळे इंदिरा गांधी यांचे नेतृत्व आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आले.१९७४ मध्ये भारताने राजस्थानमधील पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली. यामुळे भारताने अणुऊर्जा क्षेत्रात आपली क्षमता जगासमोर सिद्ध केली. हरितक्रांतीच्या काळात कृषी उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांना त्यांच्या सरकारच्या काळात चालना मिळाली. त्यामुळे भारताच्या अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली.मात्र, त्यांच्या राजकीय कारकिर्दीत काही वादग्रस्त निर्णयही झाले. २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू करण्यात आली. या काळात नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर निर्बंध आले, प्रसारमाध्यमांवर नियंत्रण ठेवण्यात आले आणि अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांना अटक करण्यात आली.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जड्ढ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

संगमनेर तहसीलदार-तलाठ्यांतील संघर्ष चव्हाट्यावर!

तलाठी संघटनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव तर दुसरीकडे आरोप तथ्यहीन असल्याचा दावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तहसील कार्यालयातील तहसीलदार आणि तलाठी कर्मचाऱ्यांमधील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर आला आहे. तहसीलदार धीरज मांजरे यांनी तलाठी विक्रम ओतारी यांना शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेच्या निषेधार्थ तलाठी व महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली असून, कारवाई न झाल्यास टंचाईसंबंधी कामे वगळता कामबंद आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे संगमनेरच्या महसूल विभागातील वातावरण तापले आहे.

संगमनेर तहसील कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून तहसीलदार आणि काही तलाठी कर्मचाऱ्यांमध्ये मतभेद असल्याची चर्चा सुरू होती. मात्र, तलाठी विक्रम ओतारी यांना तहसीलदारांनी शिवीगाळ केल्याचा आरोप समोर आल्यानंतर या वादाला नवे वळण मिळाले आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या कथित प्रकारामुळे महसूल कर्मचाऱ्यांमधील नाराजी अधिक तीव्र झाल्याचे बोलले जात आहे.

तालुका तलाठी संघटनेचे अध्यक्ष आणि तहसीलदार यांच्यातही शाब्दिक वाद झाल्याची चर्चा असून, या घटनांमुळे तहसील कार्यालयातील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. तहसीलदार मांजरे हे कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना आणि प्रशासकीय कामकाज करताना अनेक वेळा अरेरावीची भाषा करतात. प्रसंगी शिवीगाळ करतात.

तहसीलदार धीरज मांजरे यांच्या कार्यपद्धतीबाबत काही महसूल कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याची चर्चा आहे. सहकारी कर्मचाऱ्यांशी आक्रमक पद्धतीने वागणूक दिली जात असल्याचे आरोपही पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर तहसीलदार आणि तलाठी यांच्यातील मतभेद मिटविण्यासाठी वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे.

मात्र, या आरोपांबाबत तहसीलदारांची अधिकृत बाजू समोर आलेली नसल्याने संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे महत्त्वाचे ठरणार आहे. केवळ आरोप-प्रत्यारोपांमध्ये प्रकरण अडकून न पडता वस्तुस्थिती स्पष्ट व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष- या प्रकरणी तलाठी व महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. यावेळी अनेक तलाठी उपस्थित होते. या मागणीची दखल न घेतल्यास टंचाईसंबंधी अत्यावश्यक कामे सुरू ठेवून अन्य कामकाज बंद करण्याचा इशारा संघटनेने दिल्याचे समजते.

दरम्यान, तहसीलदारांच्या अन्यत्र बदलीची मागणीही काही स्तरांतून पुढे येत असल्याची चर्चा आहे. तथापि, या मागणीबाबत अधिकृत निर्णय झाल्याची माहिती उपलब्ध नाही.

संगमनेर तालुक्यात महसूल विभागाची कामे सुरळीत सुरू राहणे, नागरिकांची कामे वेळेत होणे आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय टिकून राहणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी या तक्रारीची कशी दखल घेतात, चौकशीचे आदेश देतात का आणि संबंधित वादावर कोणता तोडगा काढतात, याकडे आता महसूल कर्मचाऱ्यांसह तालुक्याचे लक्ष लागले आहे.

निलंबनाच्या मागणीशी कर्मचारी असहमत

संगमनेर : तहसीलदारांना तीन दिवसांत निलंबित करा, अन्यथा काम बंद आंदोलन करू, अशी भूमिका जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने घेण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे. मात्र, या भूमिकेशी संगमनेर उपविभागातील अनेक महसूल कर्मचाऱ्यांनी असहमती दर्शविली आहे. यासंदर्भात कर्मचाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी संगमनेर यांना निवेदन दिले आहे. दुष्काळी परिस्थितीतील महत्त्वाची कामे आणि निवडणूक कामकाज युद्धपातळीवर सुरू असताना सर्व सभासदांना विश्वासात न घेता आंदोलनाचा निर्णय घेणे अयोग्य असल्याचे निवेदनात म्हटले आहे. श्री. विक्रम ओतारी व जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित घटनेची शहानिशा न करता एकतर्फी आंदोलनाची भूमिका घेतल्याचा आक्षेप कर्मचाऱ्यांनी नोंदविला आहे. त्यामुळे २८ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनाशी आपण सहमत नसल्याचे स्पष्ट करत विश्वजीत चौघुले, डी. बी. भालचीम, पी.ए. भुरे, संकेत काशीद, सावळे बाळकृष्ण, श्रीमती पी. व्ही. वर्पे, पी. एम. डहाळे. जी.व्ही सोनवणे, पी.जी. ढोले, एम. बी. चाकणे, ए. आर. आव्हाड, श्रीमती मंगल सांगळे, एम. आर. डोंगरे, पी. टी. फटांगरे, संतोष काळंगे, भडकवाड एम.व्ही., पी. व्ही. गुरव, रविंद्र थोरात, शिंदे के. के., अनिल थोरात, रासणे व्ही. व्ही. ढेरंगे सचिन यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांनी या निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन
तहसीलदार मांजरे यांना पाठिंबा

संगमनेर : तहसीलदार धीरज मांजरे यांच्याविरोधात तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष विक्रम ओतारी यांनी केलेले आरोप तथ्यहीन असून, त्यात कोणतेही तथ्य नसल्याचा दावा तहसील कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी केला आहे. यासंदर्भात अनेक कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

या निवेदनात कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे की, तहसीलदार मांजरे यांच्यासोबत दररोज आठ ते नऊ तास काम करताना त्यांचे कधीही असभ्य वर्तन किंवा अरेरावी अनुभवास आलेली नाही. उलट ते कर्मचाऱ्यांना सहकार्य करतात, त्यांच्या अडचणी समजून घेतात आणि कुटुंबप्रमुखाप्रमाणे मार्गदर्शन करतात. विक्रम ओतारी यांनी कर्मचाऱ्यांची संमती न घेता त्यांच्या वैयक्तिक बाबी तक्रारीत नमूद केल्या असून, सोशल मीडियावर तहसीलदार व महसूल विभागाची प्रतिमा मलिन केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. २१ ऑक्टोबर रोजी तहसीलदारांच्या कक्षात घडलेल्या प्रसंगावेळी काही महसूल कर्मचारी व निवासी नायब तहसीलदार उपस्थित होते. मात्र, त्यावेळी तहसीलदारांनी कोणतेही अपशब्द वापरले नसल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. तहसील कार्यालयातील रिक्त पदांमुळे कामकाजाचा ताण असतानाही तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज सुरळीत सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, २१ ऑक्टोबरच्या घटनेची वस्तुस्थितीदर्शक व निष्पक्ष चौकशी करावी तसेच तहसीलदार मांजरे आणि तहसील कार्यालयाची होत असलेली बदनामी थांबवावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

वीजबिल थकले म्हणून महावितरण कर्मचाऱ्याला बेदम मारहाण

चार चाकीने चिरडण्याचाही प्रयत्न; दोघांना अटक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित केल्याचा राग मनात धरून दोघांनी महावितरणच्या तरुण तंत्रज्ञावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना संगमनेर खुर्द येथे घडली. ओंकार सातपुते (वय २४) यांना शिवीगाळ करत बेदम मारहाण करण्यात आली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी चारचाकी वाहनातून त्यांचा पाठलाग करून चिरडण्याचाही प्रयत्न केला. मात्र, एका वाहनचालकाने वेळीच मदतीसाठी धाव घेतल्याने सातपुते यांचे प्राण बचावले. कर्तव्य बजावणाऱ्या वीज कर्मचाऱ्यालाच अशा प्रकारे लक्ष्य करण्यात आल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महावितरणचे तंत्रज्ञ ओंकार सातपुते हे संगमनेर खुर्द परिसरात वीज वितरण कंपनीचे काम करत होते. संबंधित ग्राहकाचे वीजबिल थकीत असल्याने नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. याच कारणावरून संतप्त झालेल्या दोघांनी सातपुते यांच्याशी वाद घालत त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोघांनी त्यांच्यावर हल्ला चढवत बेदम मारहाण केली.

मारहाणीनंतरही आरोपींचा संताप शांत झाला नाही. त्यांनी चारचाकी वाहनातून सातपुते यांचा पाठलाग केला आणि त्यांना वाहनाखाली चिरडण्याचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे सातपुते यांचा जीव धोक्यात आला होता. मात्र, प्रसंगावधान राखत एका वाहनचालकाने मदतीचा हात दिल्याने मोठा अनर्थ टळला.

या प्रकरणी संगमनेर शहर पोलिसांनी अजीज उर्फ बाबू छोटू कुरेशी (वय २८) आणि मोबीन शाकीब कुरेशी (वय २६, दोघे रा. संगमनेर खुर्द) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्परतेने तपासाची चक्रे फिरवली. पोलीस उपनिरीक्षक हर्षवर्धन बहीर यांच्या मार्गदर्शनाखाली सूरज मेढे, विजय खुळे, विजय आगलावे आणि बाळासाहेब सातपुते यांच्या पथकाने अवघ्या काही तासांत आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले.

कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

वीजबिल थकीत असल्यास नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची जबाबदारी महावितरणच्या कर्मचाऱ्यांवर असते. मात्र, शासकीय व सार्वजनिक सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच अशा प्रकारे मारहाण आणि जीवघेण्या हल्ल्यांना सामोरे जावे लागत असेल, तर त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनतो. नियमांनुसार काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर हल्ले करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू । कांजीवरम । सिल्क
पैठणी । बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
सर्जरी विभाग | डायलिसीस विभाग | हृदयरोग विभाग | जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25